पुण्यनगरी ५.११.२४.

# भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे आज मीरा-भाईंदर दौऱ्यावर

**। मीरा रोड :** भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे रविवार, ६ नोव्हेंबरला मीरा-भाईंदर शहर दौऱ्यावर येत आहेत. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे हे संघटनात्मक बांधणी व भेटीसाठी तीनदिवसीय ठाणे जिल्हा दौऱ्यावर असून रविवारी अखेरचा दिवशी मीरा-भाईंदरमध्ये येणार आहेत.

मीरा-भाईंदर शहरात रविवारी सकाळी ९ वाजल्यापासून प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या दौऱ्याला सुरुवात होणार आहे. मीरा-भाईंदरमध्ये भाजपमध्ये गटबाजी सुरू आहे. या गटबाजीमुळे पक्षांतर्गत वाद सुरू आहेत. महापालिकेच्या येणाऱ्या निवडणुकीत या गटबाजीमुळे नुकसान होऊ शकते. माजी आमदार नरेंद्र मेहता व जिल्हाध्यक्ष रवी व्यास यांचे पटत नसल्याने त्यांचे दोन गट निर्माण झाले आहेत. आमदार गीता जैन या भाजपमध्ये आल्यामुळे त्यांचे मेहता यांच्याशी पटत नसल्यामुळे हा वाद चव्हाट्यावर आला आहे. बावनकुळे यांच्या दौऱ्यामुळे हा वाद मिटणार का हे आता पाहावे लागेल. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे हे रिना मेहता कॉलेज, भाईंदर पश्चिम येथे युवा वॉरिअर शाखेचे उद्घाटन करून भाईंदर पश्चिम येथे बुथ कमिटी बैठक घेतील.

दुपारी १२.१५ भाईंदर पश्चिम येथील बावन जिनालय, दुपारी १ वा. भाईंदर पूर्वच्या इंद्रप्रस्थ येथे धन्यवाद मोदीजी अभियानांतर्गत व नवमतदार नोंदणी अभियानात दोन-दोन घरी भेट देतील. दुपारी ३ वा. गोल्डन नेस्ट येथील आगरी भवन कार्यालयात, दुपारी ३.४० वा. लल्लन तिवारी कॉलेज, नवघर रोड, भाईंदर पूर्व यासह विविध सामाजिक कार्यक्रमांना भेटी देणार आहेत. सायंकाळी ५ वा. नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथून काढण्यात येणाऱ्या बाईक रॅलीतही ते सहभागी होतील. सायंकाळी ६ वा. राधेश्याम डोम ग्राऊंड, भाईंदर पश्चिम येथे भाजप जिल्हा संघटनात्मक बैठक व मेळाव्याला मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्याला या गटबाजीमुळे माजी आमदार मेहता व त्यांचे समर्थक हे कार्यक्रमाला हजेरी लावणार की पुन्हा आपली नाराजी दाखवत कार्यक्रमाकडे पाठ फिरवणार, हे रविवारी लोकांना समजणार आहे.

# अनधिकृत इंटरनेट कंपन्यांच्या वायरीमुळे शहराचे विद्रुपीकरण

← पुण्यनगरी ५.११.२४

**। वसई :** वसई तालुक्यात सध्या इंटरनेटचे जाळे वाढत असल्याने शहराचे विद्रुपीकरण होतच आहे. मात्र, वायरी तुटत असल्याने अनेकदा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तसेच पालिकेचा महसूल बुडवला जात असून, कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे... अशीच काहीशी परिस्थिती शहरात निर्माण झाली आहे. अशा फुकट्या इंटरनेट कंपन्यांवर कारवाई करावी, अशी मागणी मनसेचे विभाग अध्यक्ष महेश पालांडे यांनी केली आहे.



वसई-विरार-नालासोपारा-नायगाव ही शहर झपाट्याने वाढत असल्याने येथील लोकसंख्येतही दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. अवैध घरांचे जाळे ज्याप्रमाणे शहरात वाढत असल्याने हिरवळ असलेल्या हरित वसई-विरार शहराला अवैध बांधकामांची नगरी असे संबोधिले जात असताना शहराला अजून एक नवीन ओळख मिळत आहे, ती म्हणजे अवैध इंटरनेट जाळ्याची नगरी म्हणून. शहरात सर्वत्र चुकीच्या पद्धतीने इंटरनेटच्या वायरी इथून-तिथून फेकल्या जात आहेत आणि यावर महानगरपालिका विभागाचे कुठलेच निर्बंध, पकड नाही, आणि याच कारणामुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. शहरात ज्या प्रकारे इंटरनेटच्या वायरी पसरत आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारे, इंटरनेट खांब, ब्रेकेट किंवा कोणताही ब्रेक टॉवर नाही. ५ ते ६ व त्याहून जास्त किलोमीटरपर्यंत वायर रस्त्यालगत असलेल्या महानगरपालिका जागा, वास्तूंचा, मालमत्तेचा वापर केला जात आहे. या इंटरनेट वायर महानगरपालिकाचे पोल, स्ट्रीट लाईट, विजेच्या खांबांवरून फेकल्या जात आहेत. त्यामुळे वायरींवर ताण पडल्याने महानगरपालिकेच्या मालमत्तेचे नुकसान होत आहे व वायरही तुटून रस्त्यावर पडत असल्याने दुचाकीस्वारांचा अपघात होण्याच्या घटना वाढत असून, त्यांना गंभीर दुःखापतदेखील होत आहे. शहरातील अवैध, इंटरनेटच्या वायरी पालिका आयुक्तांनी हटवण्याचे आदेश द्यावे. तसेच महानगरपालिका मालमत्तेचा वापर व होणारे नुकसान पाहता शास्ती दंड वसूल कारण्यात यावा, इंटरनेट ही काळाची गरज आहे हे नाकारता येत नसल्याने इंटरनेट सेवा इंटरनेट कंपनींना नवीन नियमावली आखून द्यावी व कर स्वरूपात त्यांच्याकडून मासिक कर आकारण्यात यावा. अशी मागणी मनसे विभाग अध्यक्ष पालांडे केली आहे.

# गुन्ह्याचा तपास निष्पक्षपणे करा अन्यथा आंदोलन

← पुण्यनगरी ५.११.२४.

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिका कर्मचारी सेनेचे अध्यक्ष हरेश सुतार यांच्यावर महापालिका कर्मचाऱ्याने खोटा गुन्हा दाखल केल्याचा मनसे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी दावा केला असून, या खोट्या गुन्ह्याचा तपास निष्पक्ष करा, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. मीरा-भाईंदर महापालिकेत प्रभाग क्र. १ मधील स्वच्छता निरीक्षक हा कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण न करता ठेकेदाराच्या फायद्यासाठी व त्याच्या सांगण्याप्रमाणे काम करत असून, खाजगी कर्मचाऱ्यांना कमी पगार दिला जातो, अशा अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे मनसेच्या महापालिका कर्मचारी सेनेचे अध्यक्ष हरेश सुतार त्यांना जाब विचारण्यासाठी गेले होते. परंतु त्यांनी त्यांचे म्हणणे न ऐकता त्यांच्यावर जातीवाचक शिव्या दिल्याचा आरोप करत ॲट्रोसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला. त्या मनपा कर्मचाऱ्याचा निषेध मनसेने केला आहे.

पुण्यनगरी पा. नं. ५.

# पोलिसांनी पकडलेल्या पशुंचे संगोपन व हस्तांतराच्या उपाययोजना घोषित

## शासन आदेश पारीत

**। नांदेड** : गोवंश हत्या बंदी अंमलात आल्यानंतर पोलिसांनी पकडलेल्या गोवंशांच्या संगोपनासाठी गोशाळ अथवा पांजरपोळकडे हस्तांतर करण्यात येत होते. परंतु कालांतराने या पशुंना पुन्हा कत्तलीसाठी विक्री होत असल्याची बाब समोर आली. त्यामुळे राज्य शासनाने ४ नोव्हेंबर रोजी पशुंच्या हस्तांतरांसाठी शासन निर्णय पारित केला असून त्याची जबाबदारी पोलीस अधिकारी, पशुवैद्यकी अधिकारी, गोशाळा-पांजरपोळ प्रशासन यांच्यावर टाकली असून शासन आदेशाची काटेकारपणे अंमलबजावणी करण्याचा आदेश देण्यात आला आहे. हा आदेश ४ नोव्हेंबर रोजी अवर सचिव विकास कदम यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आला आहे.

या प्रकरणात पोलीस अधिकारी व पशुवैकीय अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही करताना बेकायदेशीर पशुंची वाहतमक करताना पोलीसांनी व इतर संस्थानी जप्त केलेल्या पशुंच्या प्रकरणात तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा. जप्त केलेल्या पशुंची पशुवैद्यकीय अकिधाऱ्यांकडून आरोग तपासणीचा दाखल घेण्यात यावा. त्यानंतर गोशाळेला देण्यात यावे.

न्यायालयाच्या आदेशानुसार जप्त करण्यात आलेल्या पशुंचे संरक्षण-संगोपन करण्यासठी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त तथा जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समितीचे सदस्य सचिव यांनी हस्तांतर करताना गोशाळा अथवा पांजरपोळ यांच्याकडे पायाभूत सुविधा असल्याची खात्री करावी. अशा गोवंशाचे वेळोवेळी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्वास्स्थतपासणी करावी.

तसेच न्यायालयाच्या आदेशानुसार गोशाळा अथवा पांजरपोळ संस्थी पशुंचे हस्तांतरण केलेल्या पशुंची अँगींग करुन इनाफ प्रणालीवर नोंद करावी. त्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवणे बंधनकारक आहे. जिल्हा पशुसंवधन उपायुक्त तथा जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समितीचे सचिव यांच्या परवानगी शिवाय जप्त करण्या तआलेल्या पशुंचे इतर व्यक्ती संस्थाकडे हस्तांतरण करता येणार नाही. तसेच शेतकऱ्यांना वापरण्यासाठी -विक्री करण्यासाठी परवानगी देता येणार नाही. पशु मृत्यूमुखी झाल्यास त्यांची नोंद ठेवणे आवश्यक आहे. या आदेशामुळे पशुंच्या संरक्षण व संगोपन चांगले होणार आह.

पुण्यनगरी पा. नं. २०

# हिवाळी अधिवेशन १२ डिसेंबरपासून?

**। कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत अंतिम निर्णयाची शक्यता**

**। मुंबई** : गुजरात निवडणुकीच्या तारखांमध्ये बदल झाल्याने राज्य विधिमंडळाचे नागपूरमध्ये होणारे हिवाळी अधिवेशन आठ दिवस अगोदर घेण्याची शिफारस कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत केली जाणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यानुसार हे अधिवेशन १९ डिसेंबरऐवजी १२ डिसेंबरपासून सुरू होऊ शकते, असे सांगण्यात येत आहे.

गुजरात विधानसभा निवडणुकीच्या तारखा लक्षात घेऊन राज्य सरकारने हिवाळी अधिवेशनासाठी १९ डिसेंबर ही तारीख निश्चित केली होती. मात्र, गुजरात विधानसभेसाठी १ आणि ५ डिसेंबर २०२२ अशा दोन टप्प्यांत मतदान होऊन ८ डिसेंबरला निकाल घोषित होणार आहे.

गुजरात निवडणुकीची प्रक्रिया ८ डिसेंबरला संपत असल्याने विधिमंडळाचे अधिवेशन एक आठवडा आधी म्हणजे १९ डिसेंबरऐवजी १२ डिसेंबरपासून सुरू होऊ शकते, असे बोलले जात आहे. त्याशिवाय मागील दोन वर्ष कोरोनामुळे नागपूर अधिवेशन होऊ शकले नव्हते. त्यामुळे नागपुरात किमान तीन आठवडे १२ डिसेंबर ते २७ किंवा २८ डिसेंबर अधिवेशन घेण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक विदर्भ मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींचा आग्रह आहे. विरोधकांकडूनदेखील याबाबत मागणी होत असून, येत्या आठवड्यात कामकाज सल्लागार समितीची बैठक घेऊन त्यात निर्णय होण्याची शक्यता विधिमंडळ सूत्रांनी व्यक्त केली आहे. ऑगस्टमध्ये पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे १९ डिसेंबरपासून सुरू होईल, असे घोषित करण्यात आले होते. त्यात आता बदल प्रस्तावित आहे, असेही या सूत्रांनी सांगितले.

लोकमत पु.पा.१

# गुन्हेगारांना रोखणार 'गुडमॉर्निंग स्क्वॉड'

## पोलीस ठाण्यांच्या हद्दीत 'स्मार्ट ई-बीट'

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी मीरा-भाईंदर व वसई-विरार आयुक्तालयाच्या हद्दीत 'गुड मॉर्निंग स्क्वॉड' आणि 'स्मार्ट ई-बीट' सुरू करण्यात आले आहे. विविध धर्मांच्या प्रार्थनास्थळांवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी हे पथक कार्यरत राहणार आहे. तर मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून रात्री होणारी लूटमार रोखण्यासाठी 'स्मार्ट ई-बीट' ॲपद्वारे पोलीस सतर्क राहणार आहेत.

गुडमॉर्निंग स्क्वॉडसोबतच नव्याने सुरू केलेली 'स्मार्ट ई-बीट' सध्या काशिमीरा, माणिकपूर, पेल्हार, विरार या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सुरू होती. आता आयुक्तालयाच्या सर्व १६ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही सुविधा सुरू झाली आहे. स्मार्ट ई-बीट हे ॲप १२१७ पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या मोबाइलमध्ये डाऊनलोड केले आहे. सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकूण ७५२ बीट पॉइंट निवडले आहेत. पोलीस कर्मचारी त्या बीट पॉइंटपर्यंत पोहोचला किंवा नाही, याची पूर्ण माहिती मोबाइलमधील ॲपद्वारे सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना मिळते. या ॲपमध्ये एकूण किती बीट पॉइंट आहेत व दिवसात किती कव्हर केले व किती पॉइंट मिस झाले, याची माहिती मिळते.

या ॲपमध्ये लवकरच गुडमॉर्निंग स्क्वॉडचाही समावेश करण्यात येणार असल्याचे आयुक्तालयातून सांगण्यात आले.

पुढारी पा.नं.१

# होय, आम्ही बेईमान ठाकरेंचा सूड घेतला

## फडणवीस यांचे विधान

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

उद्धव ठाकरे यांनी माझ्या आणि भाजपच्या पाठीत खंजीर खुपसला, आमच्याशी बेइमानी केली, त्याचा बदला घेण्याची संधी आम्ही शोधत होतो, आणि योग्य वेळ येताच आम्ही सूड घेतला, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी करून खळबळ उडवून दिली.



**एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचा प्रस्ताव मीच आमच्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना दिला होता आणि तो त्यांनी मान्य केला, असा दावा करून फडणवीस म्हणाले, सरकार आणण्यासाठी काही तडजोडी कराव्या लागतात. त्या आम्ही केल्या.**


इंडिया टुडे कॉन्क्लेव्ह मध्ये फडणवीस यांची मुलाखत झाली. राज्यातील सत्तांतरावर बोलताना फडणवीस म्हणाले, आम्ही राजकीय नेते आहोत. आम्ही काही तपस्या करायला येथे आलेलो नाही. आम्ही काही साधू संत नाहीत त्यामुळे ते आमच्याशी बेइमानी करत असतील तर त्याचा जवाब आम्ही देणारच. आम्हीही उद्धव ठाकरे यांना उत्तर दिले.

भाजप आणि शिवसेनेने एकत्र निवडणूक लढविली, मी मुख्यमंत्रीपद होणार हेही ठरले. पण विधानसभा निवडणुकीनंतर नंबर असे आले की आता भाजपचा गेम करता येईल असे त्यांचे ठरले, आमच्या पाठीत खंजीर खुपसला त्यामुळे मी सुध्दा त्याचा सूड घेतला, असे फडणवीस यांनी ठामपणे सांगितले.

आम्ही सत्तांतर करण्याचे प्रयत्न करत होतो. यात उद्धव आणि आदित्य ठाकरे यांच्या कार्यपद्धतीवर एकनाथ शिंदे नाराज होते. आम्ही संधी शोधत होतो, आणि सरकार पाडले, असे फडणवीस म्हणाले.

माझे आणि शिंदेचे पहिल्यापासून चांगले संबंध आहेत. मी उपमुख्यमंत्री आहे म्हणून मला दुय्यम वागणूक त्यांनी दिली नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. अडीच वर्षात आघाडी सरकार आपण बघितले. सर्वच आघाड्यावर राज्य मागे गेले. त्यामुळे बदल गरजेचा होता, असे त्यांनी नमूद केले. शिंदे गटात आलेल्या आमदारांवर आरोप आहेत, या प्रश्नावर ते म्हणाले, महापालिका कोणाच्या इशाऱ्यावर चालत होती. मुख्य फायदा कुठे जात होता. त्यामुळे बाकी सगळे प्यादे होते, असे ते म्हणाले.

सकाळ ५-४-९.



# महामार्गाला पर्यायी मार्ग

**भाईंदर (बातमीदार) : मुंबई-अहमदाबाद द्रुतगती महामार्गाला मिरा-भाईंदरच्या हद्दीत पर्यायी रस्ता लवकरच उपलब्ध होणार आहे. हा मार्ग एमएमआरडीएच्या निधीतून बांधण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे अतिशय वर्दळीच्या या मार्गावरच्या वाहतूकीचा ताण काही प्रमाणात हलका होणार आहे.**

पर्यायी रस्ता एमएमआरडीएच्या माध्यमातून सिमेंट कॉंक्रीटचा बांधण्यात यावा असा प्रस्ताव तीन वर्षांपूर्वी महापालिकेने दिला होता. काही दिवसांपूर्वीच शहरातील मुख्य रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे बांधण्यासाठीच्या १०३४ कोटी रुपयांच्या पालिकेच्या प्रस्तावाला राज्य सरकारने मान्यता दिली. यापैकी एमएमआरडीएकडून पालिकेला ५०० कोटी मिळणार आहेत, तर ५०० कोटी रुपयांचे कर्ज एमएमआरडीएकडून देण्यात येणार आहे, उर्वरित १५० कोटींचा खर्च महापालिकेला स्वत:च्या निधीतून करायचा आहे. या प्रस्तावातील ज्या रस्त्यांसाठी एमएमआरडीए महापालिकाला ५०० कोटी रुपयांचा निधी देणार आहे. त्या रस्त्यांच्या यादीत मुंबई अहमदाबाद महामार्गाच्या पर्यायी रस्त्याचा समावेश करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे.

## राष्ट्रीय महामार्गावरील ताण हलका

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मिरा-भाईंदरचे प्रवेशद्वार काशिमिरा नाका देखील आहे. त्यामुळे शहरात येणाऱ्या वाहनांना कोंडीचा सामना करावा लागतो. यासाठी पालिकेने मिरा-भाईंदरच्या हद्दीत पर्यायी रस्ता बांधण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. गुजरातहून व ठाण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारी सर्व वाहने या पर्यायी रस्त्याने थेट दहिसर चेकनाक्याला जाऊ शकणार आहेत. त्यामुळे शहरातून जाणाऱ्या रस्त्यावरचा ताण हलका होणार आहे.

## असा असेल प्रस्तावित मार्ग

प्रस्तावानुसार घोडबंदर नाक्यावरील साई पॅलेस या हॉटेलच्या बाजूने तीस मीटर रुंदीचा हा रस्ता काढण्यात येणार आहे. तो महामार्गाला समांतर ठाकूर मॉलपर्यंत जाणार आहे. त्यानंतर तो पुन्हा मुंबई अहमदाबाद महामार्गाला मिळणार आहे.

लोकमत ५-४-९.

# वृद्धाला ४६ हजारांचा गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : ज्येष्ठ नागरिक विनोदकुमार झा हे शनिवारी दुपारी त्यांच्याकडील बँक ऑफ इंडियाच्या एटीएम कार्डद्वारे न्यू गोल्डन नेस्ट परिसरातील एटीएममधून पैसे काढत होते. तेथे उभ्या असलेल्या एका अनोळखी व्यक्तीने एटीएममध्ये कार्ड चुकीचे टाकल्याचे त्यांना सांगितले. त्याचवेळी मदतीच्या बहाण्याने हातचलाखी करून कार्डची अदलाबदल केली आणि पासवर्डही पाहून ठेवला. त्यानंतर झा यांच्या खात्यातून ४६ हजार रुपये काढले.

म.टा. पा.नं.३०

# बाजारात पुरेसे सीटबेल्टच नाहीत?

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**



चारचाकीमधील सहप्रवाशांना सीटबेल्ट लावण्याचा नियम शहरात बंधनकारक करण्यात आला आहे. याचे पालन करण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी मुंबई टॅक्सीमेन्स युनियनने केली आहे.

शहरात धावणाऱ्या बहुतांशी टॅक्सी या जुन्या आहेत. या वाहनातील मागील आसनांसाठी कारउत्पादकांनी सीटबेल्ट दिलेले नाहीत. सध्या बाजारात पुरेसे सीटबेल्ट उपलब्ध नाहीत. टॅक्सी संघटनेने चारचाकी उत्पादकांना बाजारात सीटबेल्ट उपलब्ध करण्यास सांगितले आहे. यामुळे वाहतूक पोलिसांनी या नियमांच्या सक्तीसाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी मुंबई टॅक्सीमेन्स युनियनने ए. एल. क्वाड्रोस यांनी केली आहे.

**नियमसक्तीला मुदतवाढ देण्याची मागणी**

चारचाकी वाहनधारकांसह सहप्रवाशांसाठी सीटबेल्ट बंधनकारक करण्यात आले आहे. सध्या वाहतूक पोलिसांकडून ११ नोव्हेंबरपर्यंत केवळ समज दिली जाणार आहे. त्यानंतर प्रवाशांनी सीटबेल्ट लावला नसेल तर संबंधित प्रवाशांकडून दंड आकारण्यात येईल, असा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे, या निर्णयाचे युनियनने स्वागत केले आहे. यापूर्वी संबंधित टॅक्सीचालकांवर कारवाई करण्याच्या पोलिसांच्या निर्णयावर संघटनेने नाराजी व्यक्त केली होती.

सकाळ पु.५-३०

# परदेशातील संपत्तीच्या प्रलोभनाने तरुणाला गंडा

भाईंदर, ता. ५ (बातमीदार) : परदेशातील ४५ कोटींच्या संपत्तीचे प्रलोभन दाखवून भाईंदर येथील तरुणाची लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, तो खासगी कंपनीत संगणक चालक म्हणून काम करतो. काही दिवसांपूर्वी त्याला एक ई-मेल आला. मेल पाठविणाऱ्याने स्वतःची ओळख दुबईतील बँकेचा अधिकारी म्हणून केली होती. जावा (इंडोनेशिया) येथील मुळच्या भारतीय व्यावसायिकाने दुबईतील या बँकेत भारतीय मूल्यानुसार ४५ कोटी रुपयांच्या रकमेची मुदत ठेवीच्या माध्यमातून गुंतवणूक केली होती. पण २००६ मध्ये आलेल्या त्सुनामीत या व्यावसायिकाचे निधन झाले. व्यावसायिक अविवाहित होता, त्यामुळे त्याने गुंतवलेली रक्कम बँकेत पडून आहे. ही रक्कम तक्रारदाराला देण्याचे प्रलोभन या ई-मेलमध्ये दाखविण्यात आले. तक्रारदार तरुणाचे आडनाव व इंडोनेशियातील मृत व्यावसायिकाचे आडनाव एकच असल्यामुळे यातील पन्नास टक्के रक्कम तक्रारदार तरुणाला मिळवून देण्याची प्रक्रिया सुरू करण्याची ऑफर देण्यात येत असल्याचे ई-मेलमध्ये नमूद होते.

## अशी झाली फसवणूक

तरुणाने प्रस्ताव मान्य केल्यानंतर तरुणाला साडेआठ हजार डॉलर (४ लाख ८६ हजार रुपये) बँक खाते पुन्हा जिवंत करण्यासाठी हस्तांतर करण्यास सांगण्यात आले. त्यानुसार तरुणाने दोन टप्प्यांत पैसे हस्तांतर केले. तरुणाचा विश्वास संपादन करण्यासाठी त्याला हस्तांतर केलेल्या रकमेची पावती पाठवण्यात आली व आणखी २६ हजार डॉलर कागदपत्रे तयार करण्यासाठी हस्तांतर करण्यास सांगण्यात आले. मात्र शंका आल्याने तरुणाने बँकेकडे चौकशी केली असता फसवले गेल्याचे स्पष्ट झाले.